## (३) भूपाळी

(चाल – घन:श्यामसुंदरा श्रीधरा)

उठा उठा श्री साईनाथ गुरू चरणकमल दावा ।
आधिव्याधि भवताप वारुनी तारा जडजीवा ।।धृ. ।।

गेली तुम्हां सोडूनियां भवतमरजनी विलया ।
परि ही अज्ञानासी तुमची भुलवि योगमाया ।
शक्ति न आम्हां यत्किंचितही तिजला साराया ।
तुम्हीच तीतें सारुनि दावा मुख जन ताराया ।। चा० ।।

भो साईनाथ महाराज भवतिमिरनाशक रवी ।
अज्ञानी आम्ही किती तव वर्णावी थोरवी ।
ती वर्णितां भागले बहुवदनि शेष विधि कवी ।। चा०।।
सकृप होउनि महिमा तुमचा तुम्हीच वदवावा ।।
आधि० ।। उठा० ।। १ ।।

भक्त मनीं सद्भाव धरूनि जे तुम्हां अनुसरले ।
घ्यायास्तव ते दर्शन तुमचें द्वारिं उभे ठेले ।
ध्यानस्था तुम्हांस पाहुनी मन अमुचें धाले ।
परि त्वद्वचनामृत प्राशायातें आतुर झाले ।। चा०।।

उघडूनी नेत्रकमला दीनबंधु रमाकांता ।
पाहिं बा कृपादृष्टीं बालका जशी माता ।
रंजवी मधुरवाणी हरीं ताप साईनाथ ।। चा० ।।
आम्हीच अपुले काजास्तव तुज कष्टवितो देवा ।
सहन करीशी ऐकुनी द्यावी भेट कृष्ण धावां ।।
उठा उठा० ।। आधिव्याधि० ।। २ ।।